# प्रारुप

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

### जिल्हा परिषद,गोंदिया

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने/करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील पदासाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Name of Post | No. of Post | Category | Qualification | Experience | Salary |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Audiologist | 1 | SC - 01 | Degree in Audiology | 2 years Experience | 25000 |
| 2 | Optometrist | 1 | OPEN - 01 | Bachelor in Optometrist with 1 Year Experience Or Master in Optometry from any recognized university | 1 years Experience | 20000 |
| 3 | Staff Nurse | 35 | SC - 02<br>ST - 04<br>VJ-A - 03<br>NT-C - 01<br>NT-D - 03<br>SBC - 01<br>OBC - 01<br>OPEN - 20 | GNM / B.Sc. (Nursing) Maharashtra Nursing Council Registration | NIL | 20000 |
| 4 | 1. Nephrologists | 01 | SC(1), OPEN(1) | DM, Nephrology | NIL | 125000 |
| | 2. Cardiologist | 01 | | DM, Cardiology | | |
| 5 | 1. Pediatrician | 02 | SC - 02<br>ST - 01<br>VJ-A - 01<br>NT-C - 01<br>OPEN - 05<br>EWS – 02 | MD (Ped.)/DCH/DNB | NIL | 75000 |
| | 2.OBGY/GYNAECOLOGISTS | 03 | | MD/MS GYN /DGO/DNB | | |
| | 3. ANAESTHETISTS | 03 | | MD ANAESTHESIA/DA/DNB | | |
| | 4. RADIOLOGIST | 01 | | MD Radiologist | | |
| | 5.PHYSICIAN/CONSULTANT MEDICINE | 03 | | MD MEDICINE/DNB | | |
| 6 | Medical officer (Part time) (NUHM) | 01 | OPEN - 01 | MBBS,MMC Registration | NIL | 30000 |

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>**

१) फक्त Online पध्दतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. Online पध्दतीने अर्ज भरणेकरीता www.zpgondia.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सदर अर्ज भरणेकरीता उमेदवाराने स्वत:चा Gmail Account तयार करुन घेणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

३) Online अर्ज भरण्याचा कालावधी दि 26/06/2023. (सकाळी १०.३० वाजता पासून ते 05/07/2023 (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) राहील.

४) प्राप्त अर्जाची यादी प्रकाशीत करणे (गुणाकंणासह) दि 11/07/2023 सकाळी ११.०० वाजता.

५) आक्षेप मागविण्याचा कालावधी दिनांक 14/07/2023 सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत.

६) आक्षेप निराकरण करण्याकरिताचा कालावधी दिनांक 19/07/2023

७) अंतीम यादी प्रकाशीत करण्याचा दिनांक 24/07/2023

८) गरजेपक्षा जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास मेरीट लीस्ट नुसार १:३ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलाविण्यासाठी पदनिहाय वेळापत्रक वेबसाईटवर नंतर प्रकाशीत करण्यात येईल. इतर उमेदवारांना विचारात घेण्यात येणार नाही तथापी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची यादी ही जिल्हा परिषद च्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल.

९) पदनिहाय १:३ उमेदवारांच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात येईल.

१०) अंतिम निवड यादी प्रसिध्द केल्यानंतर दुसऱ्या दिवशी नियुक्ती आदेश देण्यात येईल.

११) Online प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव याबाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन सदर मेरीट लीस्ट ही जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात येईल व संबंधीत पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

१२) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून त्याचा कालावधी हा दि. २९ जुन २०२४ पर्यंत आहे. हा कालावधी मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, रा.आ.अ.,मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार व राष्ट्रीय आरोग्य अभियान पुढे सुरु राहील्यास पुर्ननियुक्ती व्दारे वाढविण्याची कार्यवाही केली जाईल.

१३) वरील नमुद सर्व पदे हि राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

१४) वरील सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

१५) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैदयकिय अधिकारी (MBBS), विशेषज्ञ,अतिविपेशज्ञ पदावरील उमेदवार उपलब्ध होत नसल्याने सदर पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ६१ वर्ष अशी व सेवा समाप्तीची मर्यादा ७० वर्ष राहील.

१६) अभियान अंतर्गत इतर रुग्ण सेवेशी संबंधीत पदे उदाहरण ऑडीओलॉजीस्ट, आप्टोमॅट्रीक्स,स्टॉफ नर्स इत्यादी पदे भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ५९ वर्ष व समाप्ती वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

१७) उर्वरीत सर्व पदांसाठी सेवा प्रवेशाची (जाहिरातीच्या दिवशी) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे तसेच राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील तसेच या पदासाठी सेवा समाप्ती मर्यादा ६० वर्षे राहील. उक्त नमुद पदावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षे पर्यंत क्षिथील राहील.

१८) ६० वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणीत शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. शासकीय कर्मचारी यांच्यावर पूर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयांची नोंद नसावी.

१९) विशेष तज्ञ व वैद्यकीय अधिकारी या पदांकरीता महाराष्ट्र मेडीकल कॉन्सील मुंबई यांची अद्यायावत नोंदणी असणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

२०)स्टॉफ नर्स या पदांकरीता महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सील ची अद्यायावत नोंदणी असणे आवश्यक आहे.

२१)अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२२)शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२३)उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

२४)सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संस्थेत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

२५)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२६)अनुभव असलेल्या उमेदवारास निवड प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल. कामाचा अनुभव हा **आरोग्य विभागातील** शासकीय / राष्ट्रीय आरोग्य अभियान / स्थानिक स्वराज्य संस्थाचाच ग्राहय धरण्यात येईल.

२७)मा.सर्वोच्च न्यायालयाने अपिल क्रं.७७४४/१९९७ या प्रकरणी दिनांक १८/०२/२००३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेले असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. तसेच लोकसेवा आयोगाचे कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्ती केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्ष सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगु शकत नाही. सदरील नियुक्त्या या अत्यंत तातडीची गरज म्हणून असून विहित वेळेनंतर संपुष्टात येईल. तसेच अशा कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावुन घेण्याची मागणी केली असेल तर मान्य करता येणार नाही.

२८)विशेषतज्ञ पदांकरीता व वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अथवा पुरेश्या प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्यास प्रत्येक महीण्यातील दूसऱ्या व चौथ्या मंगळवारी दुपारी १२.०० वाजता थेट मुलाखात व्दारे जिल्हा शल्य चिकित्सक / मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मुलाखती घेण्यात येतील.

२९)सदर प्रक्रियेत कोणत्याही क्षणी कोणतीही पूर्व सूचना / कारण न देता कोणत्याही टप्प्यावर बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे. सदर करिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

३०)मुलाखत होणार नसल्याने तसेच संपूर्ण प्रक्रिया ही Online पध्दतीने राबविण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात बोलाविल्या शिवाय प्रत्यक्ष भेट देऊ नये.

३१)भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्रांचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास

Scanned with CamScanner

कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

३२)अर्जासोबत राखीव प्रर्वगाच्या जागेसाठी रु.१००/- व अराखीव जागेसाठी रु.२००/- ची District Integrated Health & Family Welfare Society, Gondia बॅंक ऑफ बरोडा खाते क्रं.59070100009003 IFSC Code BARB0GORELA मध्ये जमा करावे व याची जमा पवाती अर्जासोबत स्कॅन करुन जोडण्यात यावी उमेदवारांनी स्वतःखात्यातुनच रक्कम संबंधीत खात्यात जमा करावी.

३३)वरिल जाहिरातीतील अ.क्रं.४,५,६ पदांकरीता उमेदवार उपलब्ध न झाल्यास दर महिण्याच्या दुसऱ्या मंगळवार ला थेट मुलाखात आणि मा.मु.का.अ. यांच्या मान्यतेने घेण्यात येतील तसेच सदर दिवशी सुट्टी असल्यास पुढील कार्यालयीन दिवशी थेट मुलाखात घेण्यात येईल. उमेदवारांनी यासाठी येतांना मुळ कागदपत्रे व एक प्रत झेरॉक्त सोबत घेऊन येणे आवश्यक राहील.

३४)अर्जदाराने लहान कुटुंब ची प्रतिज्ञापण नमुना अ मध्ये भरुन देणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

District Health Officer
Zilla Parishad. Gondia

Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ............................................................

श्री..................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,............................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी .............................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-



Scanned with CamScanner

**Copy and Paste link in the Browser to Apply**

1. Audiologist ==> https://forms.gle/weXQzbaBC374pXv2A
2. Optometrist ==> https://forms.gle/zUer8Ztb94TxitsCA
3. Staff Nurse ==> https://forms.gle/GB4q3PH3JEyJPVhJ9
4. Nephrologist ==> https://forms.gle/ZiSYimrUedTgwfvm9
5. Cardiologist ==> https://forms.gle/er8ePkMQgGCVNfTL7
6. Pediatrician ==> https://forms.gle/565Z5yYgQwKJxe3i7
7. M.O MBBS Part Time ==> https://forms.gle/wDhkLKZyTpqGVk3y9
8. Anesthetist ==> https://forms.gle/7XWWUJwrnbuR5vYT6
9. Gynaecologist ==> https://forms.gle/YRq3CwWq29KgQeh96
10. Physician / Consultant Medicine ==> https://forms.gle/DmHatsCXnrWJNNTK6
11. Radiologist ==> https://forms.gle/J8Jqro1mPuf4sTdbA